# वार्षीक अहवाल
# (2017-2018)

## 1) जनसाथी दुष्काळ निवारण व शाश्वत विकास कार्यक्रम :-

दिलासा संस्था व संस्कृती संवर्धन मंडळ संगरोळी जि. नांदेड यांच्या आर्थिक सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांच्या वतीने गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी आणि धानोरा तालूक्यातील आदिवासी, ग्रामीण, दुर्गम भागातील 15 गावांमध्ये विविध शासकीय योजनांची तसेच म.ग्रा. रो. ह. यो. विषयी जनजागृती करुन सनियंत्रण कार्यक्रम आणि जल, जंगल, जमीन, पंचायतीराज, रोजगार, शिक्षण व आरोग्य, महिला सक्षमीकरण या विषयावर माहे एप्रिल 2017 ते मार्च 2018 पर्यंत कार्यक्रम राबविण्यात आला. त्याकरीता अवॉर्ड संस्था नागभिड यांचे सचिव गुणवंत वैद्य तसेच दिलासाचे संचालक सुहास धस आणि अभिनव संस्थेचे सचिव अकिल शेख व क्षेत्रिय कार्यकर्ते जगदिश ढोलणे तालुका आरमोरी व भास्कर गावळे तालुका धानोरा यांनी सदर उपक्रम राबवून त्याचा फायदा अनेक गरजू लोकांपर्यंत मिळवून दिला.





## 2) 4 कोटी वृक्ष लागवडीबाबत जनजागृती :-

उपवनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग गडचिरोली यांचे सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाच्या माध्यमातून दिनांक 1 जुलै ते 7 जुलै 2018 पर्यंत सप्ताहा निमित्य 4 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाबाबत कलापथकाव्दारे जनजागृती कार्यक्रम दिनांक 21/06/2017 ते 28/06/2017 पर्यंत वनपरिक्षेत्र कार्यालय गडचिरोली आणि वनपरिक्षेत्र कार्यालय कुनघाडा रै. येथील 13 गावांमध्ये राबविण्यात आला.

सदर कार्यक्रमासाठी मा. चांगले, वनपरिक्षेत्र अधिकारी गडचिरोली, मा. धोंगडे वनपरिक्षेत्र अधिकारी कुनघाडा तसेच वनपाल मा.पेंदोरकर, हेमके, साखरकर, धात्रक, कवडो, बोढे, कु. बोरकुटे, कु. मट्टामी, मा. लेकामी, ठाकरे, कु. दिकोंडावार इत्यादी वनरक्षक व वनकर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

सदर कार्यक्रमाकरीता संस्थेचे सचिव अकिल शेख यांनी दिलेल्या नियोजनानुसार कलापथक प्रमुख गणपत मोहुर्ले यांच्या संचाने जनजागृती कार्यक्रम सादर केले.





**3) <u>वृक्षारोपवन कार्यक्रम :-</u>**

महाराष्ट्र शासनाच्या वनविभागा अंतर्गत 4 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम प्रसंगी अभिनव बहुउद्देशिय कला मंच गडचिरोली या संस्थेच्या वतीने आरमोरी तालुक्यातील बोडधा चक येथील नाबार्डच्या पाणी साठवण सिमेंट बंधाऱ्याजवळ तसेच डोंगरसावंगीच्या डोंगरावर वृक्षारोपन करण्यात आले.

वृक्षारोपन प्रसंगी संस्थेचे सचिव अकिल शेख, शेतकरी मंडळाचे मुख्य समन्वयक खेवले, संस्थेचे कार्यकर्ते जगदिश ढोलणे आणि डोंगरसावंगी येथील प्रतिष्ठीत नागरीक प्रदिप नन्नावरे, राहुल गरमळे तसेच गावकरी बहुसंख्येने उपस्थित होते. वृक्षारोपनात आवळा, सिताफळ, गुलमोहर, करंजी, कडुलिंब यासारख्या वृक्षांची लागवड करण्यात आली.



4) मोफत स्कुल किट वाटप कार्यक्रम :-

सेवा सहयोग फाऊंडेशन पुणे यांचे सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातील अति दुर्गम अशा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व्यंकटरावपेठा येथील समाजातील गरजु व गरीब विद्यार्थ्यांना स्कुल किटचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाला मा. संपतराव शिडाम सरपंच ग्रामपंचायत व्यंकटरावपेठा, मा. शामराव राऊत उपसरपंच ग्रामपंचायत व्यंकटरावपेठा, मा. सुरेश डोंगरे, मा. पंधरे मुख्याध्यापक, मा. अलाम मॅडम, मा. श्रीकांत राऊत सर, संस्थेचे अध्यक्ष नाझीया शेख, संस्थेचे सचिव अकिल शेख, कोषाध्यक्ष फराह नाज, अंगणवाडी सेविका तैमुर शेख तसेच विद्यार्थ्यांचे पालक व विद्यार्थी उपस्थित होते. शाळेतील 45 विद्यार्थ्यांना स्कुल किटचे वाटप करण्यात आले.





5) समर्पण ध्यान शिबीर :-

शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे यांचे सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हा कारागृह येथे दिनांक 16/07/2017 ला सकाळी 8.00 वाजता कारागृहातील बंदिवानांसाठी योग शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्याकरीता मा. डी. एस. आळे तुरुंग अधिक्षक, मा. निमगडे वरिष्ठ तुरुंग अधिकारी, संस्थेचे सचिव अकिल शेख व तुरुंगातील कर्मचारी उपस्थित होते. त्यानंतर दिनांक 17/07/2017 ला सि.आर.पी.एफ. कॅम्प धानोरा येथे जवानांसाठी आणि प्रियदर्शनी विद्यालय धानोरा येथील विद्यार्थ्यांसाठी ध्यान शिबीराचे आयोजन करण्यात आले. समर्पण ध्यान शिबीराचे मुख्य मार्गदर्शक मा. आशिष कालावार कोषाध्यक्ष शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे तसेच संगणक तज्ञ (इंग्लंड), मा. सोहम नरवाडे संचालक शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे यांच्या उपस्थितीत पार पडले.





## 6) जिल्हा कारागृहात पुस्तके दान कार्यक्रम :-

सेवा सहयोग फाऊंडेशन पुणे यांचे सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हा कारागृह, गडचिरोली येथील बंदिवानांसाठी वाचनालय स्थापित करण्यासाठी पुस्तके दान करण्यात आली. सदर प्रसंगी जिल्हा कारागृह गडचिरोलीचे जेल अधिक्षक मा. बी. सी. निमगडे, मा. आगाशे जेल अधिकारी, मा. शंकरराव मोगरे सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गडचिरोली, मा. अकिल शेख सचिव तसेच संस्थेचे सदस्य जगदिश ढोलणे यांच्या हस्ते बंदिवानांना पुस्तक दान करण्यात आले. बंदिवानांना जेलमध्ये पुस्तके वाचनासाठी मनोरंजनात्मक, कादंबरी, आरोग्य विषयक, कायद्याचे, सामाजिक, धार्मिक इत्यादी विषयाची 150 पुस्तके देऊन वाचनालय स्थापित करण्यात आले.





## 7) कुष्ठरोगी पुनर्वसन कार्यक्रम :-

शिवप्रभा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे यांचे सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील सिर्सी ग्रामपंचायत अंतर्गत गणेशपुर नं. 2 येथील बाळकृष्ण मोतीराम वट्टी वय 53 वर्षे या नागरीकाला मागील 15 वर्षापासून कुष्ठरोगाची लागण झाल्याने त्याच्या कुटूंबाला गावकऱ्यांनी वाडीत टाकल्याने त्याचे पुनर्वसन व्हावे म्हणून सदर नागरीकाला आनंदवन वरोरा येथील रुग्णालयात उपचारासाठी व पुनर्वसनासाठी संस्थेच्या वतीने दाखल करण्यात आले. त्याकरीता शिवप्रभाचे संचालक मा. नरवाडे सर यांनी आर्थिक सहाय्य केले. तसेच संस्थेचे सचिव अकिल शेख आणि संस्थेचे कार्यकर्ते जगदिश ढोलणे यांनी पुनर्वसन कार्यक्रमास मदत केली.





8) मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर :-

महात्मे नेत्र पेढी व नेत्र रुग्णालय नागपूर यांचे सौजन्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने वडधा परिसरातील नागरीकांना नेत्र तपासणीसाठी मौजा देलोडा बुज. ता. आरमोरी येथे दिनांक 15/10/2017 ला आणि मिचगांव बुज. परिसरातील नागरीकांना नेत्र तपासणीसाठी मौजा मिचगांव बुज. ता. धानोरा येथे दिनांक 07/01/2018 ला मोफत नेत्र तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्याकरीता सौ.राधिकाताई होळी सरपंच ग्रामपंचायत देलोडा बुज., सौ. वनिताताई सहाकाटे जि.प.सदस्य गडचिरोली, विवेक खेवले, पंचायत समिती सदस्य आरमोरी, मा. डॉ. नागदेवे वैद्यकीय अधिकारी वडधा, मा. अजिजभाई जिवानी जि.प.सदस्य गडचिरोली, मा. महागु वाडगुरे पंचायत समिती सदस्य धानोरा, मा. ज्योत्सना कोवे सरपंच ग्रा.पं. मिचगांव बुज., मा. डॉ. योगेश सोयाम वैद्यकीय अधिकारी रांगी, डॉ. अनुराग, डॉ. अरविंद, डॉ. विशाल शुक्ला, डॉ.प्रणिका पाराशर महात्मे हॉस्पीटल नागपूर उपस्थित होते. सदर शिबीरात 750 लोकांची नेत्र तपासणी व आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यापैकी 150 गरजू लाभार्थ्यांची मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया महात्मे हॉस्पीटल नागपूर येथे करण्यात आली. सदर शिबीरासाठी संस्थेचे सचिव अकिल शेख यांच्या मार्गदर्शनात संस्थेचे कार्यकर्ते जगदिश ढोलणे आणि भास्कर गावळे यांनी परिश्रम घेतले.





9) कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर :-

तालुका विधी सेवा समिती धानोरा यांचे सौजन्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने दिनांक 07/01/2018 रोज रविवारला दुपारी 2.00 वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मिचगांव बुज. ता. धानोरा जि. गडचिरोली येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराला प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. टि.के. गुंडावार दिवाणी व फौजदारी न्यायालय धानोरा, संस्थेचे सचिव अकिल शेख, मा. ज्योत्सना कोवे सरपंच, ग्रा.पं. मिचगांव बुज., मा. नंदकिशोर सराडे वरिष्ठ लिपीक, मा. धनराज बगमारे कनिष्ठ लिपीक, मा. खोब्रागडे शिपाई उपस्थित होते तसेच दिनांक 31/01/2018 ला राधेश्याम बाबा यांच्या यात्रेनिमीत्य लेखा येथे विधी साक्षरता जनजागृती स्टॉल लावण्यात आले त्यावेळेस मा. पदा सहाय्यक संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती धानोरा, मा. कोलते साहेब उपस्थित होते.

सदर उपक्रमामुळे परिसरातील लोकांना ज्येष्ठ नागरीक, महिला, बालक यांच्यासाठी कोणकोणत्या प्रकारचे कायदे आहेत आणि त्याचा फायदा कसा घेता येईल याची माहिती देण्यात आली. त्याकरीता विधी स्वयंसेवक भास्कर गावळे, सौ. वैशाली म्हशाखेत्री यांनी सदर उपक्रमात सहभाग घेऊन यशस्विरित्या पार पाडला.





## 10) जिल्हास्तरीय युवा संम्मेलन 2018 :-

नेहरु युवा केंद्र गडचिरोली यांचे सौजन्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने दिनांक 11/01/2018 रोजी ॲड. एन. एस. गंगुवार अध्यापक महाविद्यालय गडचिरोली येथील सभागृहात जिल्हास्तरीय युवा संम्मेलन 2018 या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन मा. शरद साळुंके जिल्हा युवा समन्वयक गडचिरोली यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रताप सातव, सहाय्यक धर्मादाय आयुक्त गडचिरोली तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. प्रा. अमर कुरील शासकीय विज्ञान महाविद्यालय गडचिरोली, मा. सुधा सेता, मा. व्ही. ए. खान प्राचार्य शासकीय परिचारीका प्रशिक्षण केंद्र गडचिरोली, मा.व्ही. वाय. अनमुलवार निरीक्षक, सहा.धर्मादाय आयुक्त कार्यालय गडचिरोली उपस्थित होते. सदर कार्यक्रमात युवकांना तसेच स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधींना मार्गदर्शन करण्यात आले. त्याकरीता मा. अखिलेश मिश्रा नेहरु युवा केंद्र गडचिरोली, संस्थेचे सचिव अकिल शेख तसेच संस्थेचे कार्यकर्ते जगदिश ढोलणे, भास्कर गावळे, दिवाकर सहारे यांनी परिश्रम घेतले.





11) युवा पडोस संसद कार्यक्रम :-

नेहरु युवा केंद्र गडचिरोली यांचे सौजन्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने दिनांक 26 जानेवारी 2018 ला प्रजासत्ताक दिना निमित्य बंदिवानांना मनोरंजनात्मक मार्गदर्शन करण्याकरीता युवा पडोस संसद कार्यक्रमाअंतर्गत आर्केस्ट्रा कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा कारागृह गडचिरोली येथे करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन मा. दुर्वेश सोनवने, निवासी उपजिल्हाधिकारी गडचिरोली यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. सौ. योगिताताई पिपरे नगराध्यक्ष गडचिरोली उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून मा. डी. एस. आळे, तुरुंग अधिक्षक गडचिरोली, मा. व्ही. वाय. अनमुलवार, निरीक्षक सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय गडचिरोली, मा. संदिप लांजेवार गडचिरोली, मा. श्रीमती जयश्री लोखंडे, मा. बि.एस. निमगडे वरिष्ठ तुरुंग अधिकारी, मा. अकिल शेख सचिव उपस्थित होते. आर्केस्ट्राच्या माध्यमातून बंदिवानांना देशभक्तीपर गीत व लोकगीत आर्केस्ट्रा प्रमुख धात्रक सर यांच्या संचाने सादर केले. त्याकरीता तुरुंगामधील कर्मचारी व त्यांचे कुटूंब यांचे सहकार्य लाभले.





12) क्षयरोग जनजागृती कार्यक्रम :-

जिल्हा क्षयरोग अधिकारी गडचिरोली यांचे सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने जागतीक क्षयरोग दिनानिमित्य दिनांक 24 मार्च 2018 ला जिल्हा सामान्य रुग्णालय गडचिरोली येथील बाह्य रुग्ण विभागात क्षयरोग विषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमाला मा. *शंभरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली, मा. डॉ. शिवनाथ कुंभारे गडचिरोली, मा. डॉ. सचिन* हेमके जिल्हा क्षयरोग अधिकारी गडचिरोली उपस्थित होते. क्षयरोग होण्याची कारणे व त्यावर प्रतिबंधक उपाय कसा करावा याविषयी कलापथकाच्या माध्यमातून कार्यक्रम सादर करण्यात आला. त्याकरीता कलापथक प्रमुख गणपत मोहुर्ले यांनी संस्थेचे सचिव अकिल शेख यांच्या मार्गदर्शनात कलापथक सादर केले.

13) इंग्लिश इ-टिच उपक्रम :-

बॉम्बे कम्युनिटी पब्लीक ट्रस्ट यांच्या आर्थिक सहकार्याने तथा अपेक्षा होमीओ सोसायटी गुरुकुंज मोझरी ता. अमरावती यांच्या मार्गदर्शन आणि अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्यातील 25 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वर्ग 1 ते 4 थीच्या विद्यार्थ्यांकरीता इंग्रजी विषयाचा अभ्यासक्रम हा ॲनिमेशन पध्दतीने तयार करुन शाळेतील डिजीटल साधनाच्या माध्यमातून शिकविल्या जात आहे. इंग्रजी शिकविणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण दिनांक 15/02/2018 ला साधन केंद्र धानोरा येथे आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाचे उद्घाटन मा. मडावी, मा. राऊत शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती धानोरा यांचे हस्ते करण्यात आले. प्रशिक्षक म्हणून मा. समिर नंदेश्वर ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट वणी यांनी प्रशिक्षण दिले. सदर उपक्रम माहे फेब्रुवारी 2018 ते जानेवारी 2019 पर्यंत राबविण्यात येणार आहे. त्याकरीता संस्थेचे सचिव अकिल शेख आणि स्कुल फॅसिलीटेटर म्हणून भास्कर गावळे काम पाहात आहे.





14) कृषि विषयक जनजागृती कार्यक्रम :-

आत्मा कार्यालय गडचिरोली यांचे सहकार्याने तथा अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली यांचे वतीने जिल्हा स्तरीय कृषी प्रदर्शनीमध्ये पिकावर फवारणी करतांना कोणती काळजी घ्यावी या विषयीची माहिती कलापथकाच्या माध्यमातून उपस्थित असणाऱ्या शेतकऱ्यांना देण्यात आली. त्याकरीता आत्माचे संचालक डॉ. प्रकाश पवार, उपसंचालक डॉ. प्रिती हिवरकर यांचे मार्गदर्शनात संस्थेचे सचिव अकिल शेख आणि कलापथक प्रमुख गणपत मोहुर्ले यांनी कार्यक्रम सादर केला.

अध्यक्ष / सचिव
अभिनव बहुउद्देशिय कला मंच, गडचिरोली
ता.जि.गडचिरोली